## सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद नंदुरबार

### कनिष्ठ प्रशासन अधिकारी या पदोन्नती संवर्गासाठी दि.०२/०८/२०२४ रोजी विचार क्षेत्रातील कर्मचाऱ्यांच्या जेष्ठता यादी प्रसिध्द करण्यात येऊन दि.०८/०८/२०२४ पर्यंत मागविण्यात आलेल्या आक्षेप व हरकतींच्या निराकरणाबाबत

| अ.क्र. | कर्मचाऱ्यांचे नाव, पदनाम व कार्यरत ठिकाण | आक्षेप / हरकतीचे संक्षिप्त विवरण | हरकती निराकरणाबाबत केलेली कार्यवाही |
|---|---|---|---|
| ५ | श्री.अझरुद्दिन गयासुद्दिन शेख, वरिष्ठ सहाय्यक, पंचायत समिती अक्कलकुवा जि.नंदुरबार | कनिष्ठ प्रशासन अधिकारी संवर्गात पदोन्नती देणेकामी विचार क्षेत्रातील कर्मचाऱ्यांची यादी दि.०२/०८/२०२४ रोजी प्रसिध्द करण्यात आली असून सदर यादीमध्ये माझे नाव समाविष्ट करणेत आले नसल्याने मी आक्षेप नोंदवित आहे. माझी जि.प.नंदुरबार अंतर्गत अनुकंपा तत्वावर वरिष्ठ सहाय्यक या पदावर खुल्या प्रवर्गात नेमणुक झाली असून मी दि.२५/०२/२०१४ रोजी रुजू झालो आहे. वरिष्ठ सहाय्यक संवर्गाची दि.१५/०३/२०२४ रोजीच्या ज्ञापनान्ये प्रसिध्द करण्यात आलेल्या अंतिम सेवाजेष्ठता सुचीमध्ये माझे नाव अ.क्र.४८ वर नमूद आहे. माझी मुळ नेमणुकच वरिष्ठ सहाय्यक या पदावर झालेली असल्याने मी शासन निर्णय दि.२५/०५/२००४ नुसार कनिष्ठ पदावरुन आरक्षणाचा लाभ घेवून वरिष्ठ सहाय्यक पदाच्या जेष्ठता यादीत वरच्या स्थानावर आलेलो नाही. माझ्यानंतर वरिष्ठ सहाय्यक पदावर पदोन्नतीने / सरळसेवेने सेवेत रुजू झालेल्या कर्मचाऱ्यांची नावे समाविष्ट आहेत परंतु त्यांचेपेक्षा अगोदर माझी वरिष्ठ सहाय्यक पदावर नेमणुक झाली असतांना माझे नाव कनिष्ठ प्रशासन अधिकारी संवर्गात पदोन्नतीसाठी विचार क्षेत्रातील यादीमध्ये समाविष्ट करणेत आलेले नाही. शासन निर्णय दि.०७/०५/२०२१ मधील मुद्दा क्र.३ (ब) नुसार माझे नाव कनिष्ठ प्रशासन अधिकारी संवर्गात पदोन्नती देणेकामी विचार क्षेत्रातील कर्मचाऱ्यांच्या यादीत योग्य क्रमांकावर समाविष्ट करण्यात यावे. | मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी याचिका क्र.२७९७/२०१५ या प्रकरणी दि.०४/०८/२०१७ रोजी दिलेल्या निर्णयान्वये पदोन्नतीतील आरक्षण अवैध ठरविले असल्याने व मा.सर्वोच्च न्यायालयाने मा.उच्च न्यायालयाच्या या निर्णयास अद्याप स्थगिती दिलेली नसल्याने पदोन्नतीच्या कोट्यातील सर्व रिक्त पदे दि.२५/०५/२००४ च्या स्थितीनुसार सेवा जेष्ठतेने भरण्याबाबत धोरण निश्चित केल्याने सामान्य प्रशासन विभागाकडील दि.०७/०५/२०२१ च्या शासन निर्णयात नमुद अ.क्र.३ चा (अ) व (ब) नुसार दि.०१/०१/२००४ च्या जेष्ठतेनुसार पदे भरणे बाबत नमूद केले असल्याने कनिष्ठ प्रशासन अधिकारी संवर्गात पदोन्नतीसाठी विचार क्षेत्रातील कर्मचाऱ्यांची यादी शासनाकडील प्राप्त शासन निर्णयातील निर्देशानुसार असुन सदरची यादी रिक्त पदांच्या मर्यादेत तयार करण्यात आली आहे. |

उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.)
जिल्हा परिषद नंदुरबार

Signed by Pandurang Sakharam Kolhe
Date: 24-08-2024 16:35:40